| | |
|---|---|
| Subject | **सशक्त राजकारण, सशक्त भारताकरीता आठवी युवा संसद पुण्यात जाधवर ग्रुप आॅफ इन्स्टिटयूटस्, पुणे तर्फे आयोजन संसद कट्टा अंतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांची मुलाखत** |
| From | Yuva Sansad Jadhavar <yuvasansadjadhavar@gmail.com> |
| To | <sunita_adhav@yahoo.com>, <shelarsudhakar@yahoo.com>, <lvartak@rediffmail.com>, <sunetrapawar18@gmail.com>, <ravisn@tropnet.res.in>, <vmgadre@ee.iitb.ac.in>, <aa.natu@iiserpune.ac.in>, <udya.gujar@gmail.com>, <ab.pandit@ictmumbai.edu.in>, <somak@iucaa.in> 283 more... |
| Date | 22-01-2025 04:16 PM |

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 23 JAN 2025
आवक क्रमांक 456
जावक दिनांक 23 JAN 2025

मा प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
23 JAN 2025
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 252
जावक दिनांक: 25-1-25
विभाग: DISD

आवक क्र. 1724
27 JAN 2025
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

- YUVA Sansad Letter 2025.pdf (~2.1 MB)
- Yuva Sansad.jpeg (~187 KB)
- Pamplate.jpeg (~817 KB)
- Yuva Sansad Banner.jpeg (~387 KB)
- 7th Udan.pdf (~18 MB)
- Yuva Sansad_3.jpeg (~976 KB)
- Yuva Sansad_1.jpeg (~816 KB)
- Yuva Sansad_4.jpeg (~955 KB)
- Yuva Sansad_2.jpeg (~998 KB)

युवा शक्तीला योग्य गती व दिशा देऊन समाजकारण आणि राजकारणामध्ये त्यांचे अधिष्ठान निर्माण करण्याकरीता तसेच सशक्त युवा, सशक्त राजकारण व सशक्त भारताकरीता तरुणाईने पुढाकार घ्यावा, याकरिता पुण्यामध्ये आठव्या युवा संसदेचे आयोजन करण्यात आले आहे. न-हे येथील जाधवर ग्रुप आॅफ इन्स्टिटयूटस्, पुणे तर्फे गुरुवार, दिनांक ३० व शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ यावेळेत संस्थेच्या सभागृहात ही संसद होणार आहे, अशी माहिती इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष व संसदेचे संस्थापक अध्यक्ष अॅड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षी संसद कट्टा अंतर्गत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे मुलाखतीचे सत्र होणार आहे. संसदेत मागील वर्षी शिवसेनेचे नेते संजय राऊत यांची मुलाखत झाली होती. माजी कॅबिनेट मंत्री महादेव जानकर, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, गणराज्य संघाच्या संस्थापक अध्यक्ष सुषमा अंधारे, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, भारतीय छात्र संसदेचे अध्यक्ष राहुल कराड, जाधवर ग्रुप आॅफ इन्स्टिटयूटस्चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर हे संसदेच्या कार्यकारिणीमध्ये आहेत.

संसदेत देशभरातील राजकारण, समाजकारण आणि विविध विषयांतील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी महाराष्ट्रातील तरुणांना मिळणार आहे. महाराष्ट्रातून सुमारे १५०० हजार विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, लायन्स क्लब इंटरनॅशनल, रोटरी इंटरनॅशनल यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. पुण्यासह सोलापूर, अकोला, कोल्हापूर, मराठवाडा, कोकण यांसह विविध भागांतून विद्यार्थी संसदेकरीता येणार आहेत.

अॅड.शार्दुल जाधवर म्हणाले, ग्रामसभा ते लोकसभा, राजकारणातील व समाजकारणातील महिलांचा सहभाग, माध्यमे राजकारण घडवतात?, व्हिजन भारत २०२९, सशक्त युवा सशक्त राजकारण सशक्त भारत या विषयांवर संसदेत सत्र होणार आहेत. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध विषयांवर अनेक मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. वयवर्षे १६ ते ४० मधील तरुणांनी संसदेत सहभाग घ्यावा. संसदेत सहभागी होण्याकरीता मोफत प्रवेश असून विद्यार्थीनींची एक दिवसाची पुण्यामध्ये राहण्याची आणि जेवणाची सोय करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी संसदेतील सहभागाकरीता मो. ९०६७९०९०७५ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf6CfpTukLUpQlzJRzogegIQ7jfbUQhEzs1AFL9j3J5miAuYw/viewform

या
लिंकवरुन फॉर्म भरावा. त्यानुसार विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. संसदेच्या माध्यमातून युवकांनी राजकारण आणि समाजकारणातील दिग्गजांसोबत संवाद साधावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. संसदेकरीता प्रवेश विनामूल्य आहे, तरी तरुणाईने मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

Live Program link -
1. Film on Yuva Sansad- :- https://www.youtube.com/watch?v=DfnVUP3kopk

2. YouTube:- https://www.youtube.com/@jadhavargroupofinstitutespunem

3. 7th YUVA SANSAD Program Playlist:-
https://www.youtube.com/playlist?list=PLnlmAzP8brZbq1Mw1L-1gRAYv9V8TksIH

4. Film On Jadhavar Group Of Institutes :-
https://www.youtube.com/watch?v=3cAWbUpoZ5Y

5. Film on Dr Sudhakarrao Jadhavar sir :-
https://www.youtube.com/watch?v=nmi72isvL5E

6. Film on Adv Shardulrao Jadhavar sir :-
https://www.youtube.com/watch?v=U4FtH_QcQCk

7. An Appeal for Participation in
8th Youth Parliament.:-
https://youtube.com/shorts/R25M1AREMSg?si=9UYEunTaJ88X2vBh.

President,
Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar
Mo:- 9823872816

Jadhavar®
The Symbol of Success (Since 2014)

*'Education for Strength, Intellect & Wisdom'*
- Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar



# Jadhavar Group of Institutes

Late Udhavrao Tulshiram Jadhavar Foundation
Aditya Educational Foundation

Jai Ganesh Educational Foundation
Dr. Sudhakarrao Jadhavar Social Trust


**President**
**Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar**
M.Com., M.A., L.L.M., M.P.M., D.T.L.,
D.L.L., & L.W., G.D.C. & A., Ph.D.
President : All India Principal Federation
Ex. Member : Management Council, Savitribai Phule Pune University, Pune.
Secretary General : Maharashtra State Principal's Federation
General Secretary : Principal's Forum (Savitribai Phule Pune University), Pune.

**Vice President**
**Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar**
M.B.A., P.G.D.H.R.M., B.Com., D.H.R. & L., D.C.L.,
D.C.P.L., APCL., CMED., D.L.L. & L.W., L.L.M.
VICE PRESIDENT : Jadhavar Group of Institutes
• Jadhavar Hotel and Developer Pvt. Ltd. • Jadhavar Films
• Jadhavar Real Estates • Shardulrao Sudhakarrao Jadhavar Associates
• Jadhavar Legal Firm • Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar Sevakanchi Patsanstha


Ref. : Online Date : 14/01/2025

प्रति,
अधिष्ठता/ प्राचार्य/ विभागप्रमुख,
सर्व महाविद्यालय.

विषय:– 8th युवा संसदेमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत. . .

महोदय/ महोदया,

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयुट्स व युवा संसदेच्या वतीने आपणास शुभेच्छा !!!

आजपर्यंत झालेल्या सर्व 7 युवा संसदांना आपण भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल आपले आभार !!!

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयुट्स गेल्या १० वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्य करत असून युवकांना व समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, औदयोगिक, कला, क्रिडा, राजकीय, विज्ञान व सांस्कृतिक सर्व क्षेत्रातील कार्यक्रम अत्यंत मोठया प्रमाणावर राबवित आहे. हिच संकल्पना पुढे घेवून जात असताना संस्था मागील ८ वर्षांपासून युवा संसद या कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. ज्या कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्थेने युवकांमध्ये राजकीय आणि सामाजिक भान निर्माण करणे त्यांच्या सुप्त गुणांना विकासाची संधी देणे समक्ष भारताच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीस योगदान देणे असे उद्दिष्ट ठरविलेले असून युवा शक्तीला योग्य गती व दिशा देवून त्यांना मुल्यधिष्ठित समाजकारण व राजकारण करण्यासाठी प्रेरित करणे व विविध उपक्रम हाती घेण्यासाठी एक अधिष्ठान निर्माण करणे असे ध्येय व उद्दिष्ट संस्थेने ठेवलेले आहे.

तरी या वर्षी 8th युवा संसदेचे आयोजन ३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आलेले असून या कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे.

Jadhavar Group of Institutes ★ Pune -411041 Maharashtra, Bharat ★ Jadhavar

8th युवा संसदेसाठी विद्यार्थी नेत्यासाठी व महाविद्यालयासाठी खालील प्रमुख सूचनाः

1. महाविद्यालयामध्ये शेवटच्या वर्षासाठी शिकत असणा–या विद्यार्थ्यांना संसदेमध्ये येण्यासाठी प्रोत्साहित करावे कारण त्यांना अशी संधी परत मिळणार नाही.
2. ज्या विद्यार्थी नेत्यांना या संसदेमध्ये भाषण करू इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी या पत्रासोबत पाठविलेल्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये दिलेल्या विषयावरती ३ मिनिटांचा व्हिडियो करून yuvasansadjadhavar@gmail.com या ई मेल आयडीवरती दि. २५ जानेवारी या दिनांकापर्यंत पाठवावा व निवडक विद्यार्थ्यांना काही सत्रामध्ये 8th युवा संसदेमध्ये भाषण करण्याची संधी मिळेल.
3. हा कार्यक्रम https://www.youtube.com/@jadhavargroupofinstitutespunem Jadhavar Group of Institutes Pune Maharashtraया युटयुब चॅनेलवरती Live दाखविला जाईल.
4. कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. विद्यार्थी नेत्यांनी प्रवासाचा खर्च स्वतः किंवा महाविद्यालयांनी करावयाचा आहे व फक्त विद्यार्थीनी नेत्यांसाठी राहण्याची मोफत सुविधा संस्थेकडून करून देण्यात येईल.
5. जे विद्यार्थी नेत्यांना या कार्यक्रमामध्ये सहभाग घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी सोबत दिलेल्या QR कोड मार्फत नावनोंदणी करण्यास सांगावे.
   लिंकः – https://forms.gle/8msQQZhpvqbDf4Da8
6. 8th युवा संसदेसंदर्भात अधिक माहितीसाठी
   श्रीमती. श्वेता कुंभार मॅडम
   मो. ९०६७९०९०७५
   यांना संपर्क साधावा.

तरी मा. महोदय/ महोदयांनी 8th युवा संसदेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी नेत्यांना सहभागी होण्याची प्रेरणा देवून सशक्त युवा, सशक्त राजकारण व सशक्त भारत हि संकल्पना साकार करण्यासाठी योगदान दयावे. ही नम्र विनंती.

Jadhavar Group Of Institutes ★ Jadhavar ★ Pune -411041 Maharashtra, Bharat

आपला विश्वासू

ॲड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर

अध्यक्षः– युवा संसद

उपाध्यक्षः– जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस

[redacted]

**Vice-President**

Jadhavar Group Of Institutes

Pune -411041. Maharashtra, Bharat.